## पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 27/11/2019 (बुधवार)
## (सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. काटोल :- अंतर्गत 10 कि.मी अंतरावर पारडसिंगा येथे दिनांक 26/11/2019 चे 12:00 वा. ते 14:15 वा. दरम्यान फिर्यादी नामे- सदाशिव शामरावजी ढोले, वय 67 वर्ष, रा. पारडसिंगा हे घराला कुलूप लावून काटोल येथे कामाला गेले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या घराचा कुलूप कोंडा तोडून घरात प्रवेश केला. तसेच आरोपीने घरामधील बेडरूम मध्ये असलेले कपाटाचे लॉक तोडून त्यातील सोन्या-चांदीचे दागिने कि. 82,250/-रू. चा मुद्येमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि पिवाल हे करीत आहे.

### विनयभंग

पो.स्टे. काटोल :- दि. 26/11/2019 चे 17:00 वा. ते 17:50 वा. चे सुमारास 18 वर्षीय पीडित/फिर्यादी हि कॉलेजची सुट्टी झाल्यानंतर बसमध्ये चढत असतांना आरोपी नामे- प्रवीण निलकंठरावजी पाटील, वय 30 वर्ष, रा. रिधोरा याने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354 अ (1)(आय) भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री वानखेडे हे करीत आहे.

### दुखापत

पो.स्टे. जलालखेडा :- अंतर्गत 17 कि.मी अंतरावर मौजा पिपळधरा येथे दिनांक 26/11/2019 चे 20:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे- मुंकिदा नामदेवराव बन्सोड, वय 30 वर्ष, रा. पिपळधरा ता.नरखेड हे घरासमोर उभे असतांना आरोपी नामे- रामेश्वर साबळे, रा. पिपळधरा ता.नरखेड हा तेथे दारू पिवून आला. तसेच आरोपीने जुन्या वादाच्या कारणावरून फिर्यादीसोबत भांडन करू लागला व फिर्यादीने हटकले असता आरोपीने लाकडी उभारीने फिर्यादीच्या डोक्यावर व डाव्या हातावर मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 324 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार संजय इंगोले हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर